महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय,लातूर

Office : 02382-250634
Fax :- 02382-251866
E-mail:- celatur@mahadiscom.in

महावितरण

Office of the Exe. Engr. CGRF
Latur Zone, Vidyut Bhavan, Ground floor, Old power house, Sale galli,
Latur – 413512

EE/CGRF/LTR/ 70

Date :- 02.08.2018

ग्राहक तक्रार क्र. : ०६/२०१८
तक्रार दाखल दिनांक : १५.०२.२०१८

प्रति,

१ **सौ. मंगलबाई अंबादास देशमाने**
रा. शिवछत्रपती नगर, हुडको, तुळजापूर
ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद

२. **महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
उप-कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, उपविभाग, तुळजापूर

**विषय :-** तक्रार अर्ज क्र. ०६/२०१८ प्रकरणी निकाल

वरील विषयास अनुसरुन सौ.मंगलबाई अंबादास देशमाने यांच्या तक्रार अर्जाप्रमाणे सुनावणी घेवून तक्रार अर्ज निकाली काढण्यात आला आहे. सदरील प्रकरणी निकालाची छायांकीत प्रत सोबत आपल्या माहितीस्तव जोडली आहे.

3/8/18

**कार्यकारी अभियंता**
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत
ग्राहक तक्रार निवारण मंच, लातूर

**सोबत :** वरीलप्रमाणे

**प्रतिलिपी सविनय सादर :-**

१ मुख्य अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, परिमंडल कार्यालय, लातूर

**प्रतिलिपी :-**

१. अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, मंडल कार्यालय, उस्मानाबाद
२. कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, विभागीय कार्यालय, तुळजापूर
३. कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, मंडल कार्यालय, लातूर



Scanned by CamScanner

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय लातूर

ग्राहक तक्रार क्रमांक : ०६/२०१८
ग्राहक तक्रार दाखल दिनांक : १५.०२.२०१८

सौ. मंगलबाई अंबादास देशमाने
रा. शिवछत्रपती नगर, हुडको, तुळजापूर
ता.तुळजापूर जि. उस्मानाबाद -- ग्राहक अर्जदार

-- विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
उप-कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उपविभाग, तुळजापूर -- गैरअर्जदार

| कोरम : | श्री.माणिक व्ही.येवतीकर | अध्यक्ष |
|---|---|---|
| | श्री.एस.आर.कुलकर्णी | सचिव |
| | श्री.सुधीर भाऊराव देशमुख | सदस्य |

**निकाल** दि. ०२.०८.२०१८

ग्राहक अर्जदार, सौ. मंगलबाई अंबादास देशमाने, रा.हुडको, तुळजापूर ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद ग्राहक क्र. ५९३३५०१४३७१९ यांनी त्यांची तक्रार अ फॉर्ममध्ये दि. १५.०२.२०१८ रोजी ग्राहक प्रतिनिधी श्री. प्रविण अंबादास देशमाने, तुळजापूर यांच्यामार्फत मंचामध्ये दाखल केली आहे.

ग्राहक प्रतिनिधीचे गाऱ्हाणे/तक्रार खालील प्रमाणे आहे.

माहे जुलै २०१७ चे वीजदेयक अवास्तव, अयोग्य व चुकीचे आकारले असून ते दुरुस्त करुन योग्य व वास्तव वीज देयक देण्यात यावे. त्यांनी जोडलेली कागदपत्रे पाहाता त्यांना जुलै २०१७ या महिन्याचे रु.६५३४०/- एवढे बिल देण्यात आलेले आहेत. या प्रकरणाची दि.१५.०५.२०१८ रोजी सुनावणी होऊन ग्राहकाकडून श्री. प्रविण अंबादास देशमाने उपस्थित होते. त्यावेळी मीटर टेस्टींग करुन OK असल्याचे महावितरणकडून सांगण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच ऑगष्ट २०१७(१५७७ युनीट), ऑक्टोबर २०१७ (११०१ युनीट) व नोव्हेंबर २०१७ मध्ये आकारण्यात आलेली बिले चुकीची असल्याचे सांगितले. तसेच त्यांचा दरमहा वापर कमीतकमी ११४ व जास्तीत जास्त १८४ युनीट आहे असे त्यांनी त्यांच्या अर्जात नमुद केले आहे. महावितरण कंपनी कडून दि.१९.०६.२०१८ रोजी झालेल्या सुनावणीस पी. बी. महाले, उच्चस्तर लिपिक व प्रभारी सहा. लेखापाल व व्ही. के. उम्बे, निम्नस्तर लिपिक उपस्थित होते. त्यांनी असे सांगितले की, ग्राहकाचा मीटर Rolex company चा असून तो दि.१४.०९.२०१७ रोजी बदलण्यात आला आहे. त्यावेळी असे लक्षात आले की, जागेवरील जुन्या मीटरचा नंबर १६३०६१७ असा आहे, मात्र बीलावरील मीटर नं. १६३११७ असा आहे. हा मीटर बसवल्याची तारीख उपलब्ध नाही. त्यामुळे त्यांना संचित वापर झाल्याचे लक्षात आले. म्हणून त्यांना मार्च २०१४ (कारण ग्राहकाचे बील मार्च २०१४ मध्ये दुरुस्त करण्यात आले आहे) ते आक्टोंबर २०१७ या काळाचे सुधारीत संचित बील युनीटची विभागणी करून देण्यात आले.

Rolex company चे मीटर Faulty, असल्यामुळे तक्रार असल्यावर, ते बदलून द्यावे असे Circular मेन्टेनन्स (Mantenance) विभाग मुंबईकडून सर्व मुख्य अभियंत्यांना सूचीत करुन आदेश देण्यात आलेले होते. ते आदेश अद्याप अमलांत असल्याची माहिती व जाणीव महावितरण कंपनीच्या मुख्य अभियंत्याच्या अधिपत्याखाली



Scanned by CamScanner

कार्यरत असलेल्या सर्व अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना अवगत असल्याचे गृहीत धरावे लागते. त्या संबंधीत महावितरणातर्फे वृत्तपत्रात खुलासा केले नाहीत. या उलट संबंधीत Circular अस्तित्वात असताना वादग्रस्त मीटर टेस्टींग युनीट कडे पाठवले. ही कृती पाठवलेल्या Circular चा परिणाम व अमंलबजावनी न करण्याजोगी आहे. त्याउलट वादग्रस्त मीटर टेस्टींग युनीट कडे पाठवले व मीटर OK आहे असा रिपोर्ट प्राप्त करुन घेतला. ही कृती चुकीची आहे. एवढेच नसून Circular ला न जुमानता अशी आगृही भूमिका घेतल्याचे जाहीर होते. याउपर ती कृती पुरावा तयार करणे या प्रकारात मोडते. महावितरणच्यावतीने असे बचावात्मक म्हणणे मांडले की, ते मीटर बदलून ही दिले. आदेश न देता बदलून देण्याची कृती सुध्दा Circular चे अनुपालन न केल्याचे दर्शविते. यावरुन या प्रकरणातील संबंधीतानी द्विधाकृती करुन आपली भूमीका न्याय व योग्य असल्याचे प्रदर्शन केले आहे. वस्तुतः तसे केले नाही. म्हणून या प्रकरणात फक्त आकारणी दुरुस्ती करणे आणि योग्य व न्याय्य युनिटचे बील देणे गरजेचे आहे.

मंचापुढे आलेल्या कागदपत्रांचा व सुनावणी दरम्याण मांडलेल्या मुद्यांचा व महावितरणच्या संबधीत अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या कृतीचा विचार करुन मंच खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) ग्राहक अर्जदाराची अ फॉर्म मधील तक्रार मान्य करण्यात येत आहे.

२) ग्राहकास जुलै २०१७ या महिन्याचे ४६६५ युनिट चे व रु. ६५३४०/- या रकमेचे दिलेले बिल व ऑगष्ट, सप्टेंबर, व ऑक्टोंबर २०१७ या महिन्याची १५७७, ५० व ११०१ युनिटची बिले रद्द करण्यात येत आहेत.

३) ग्राहकाचा सरासरी वापर ग्राहकाच्या अर्जप्रमाणे व महावितरणच्या नोव्हेंबर २०१७ ते जून २०१८ या कालावधीच्या उपलब्ध वीजवापराप्रमाणे व उर्वरीत चार महिन्याचे बिल नियमाप्रमाणे आकारुन व त्या आधारे एक वर्षाची सरासरी काढून, दरमहा १८४ युनिट असा निश्चित करण्यात येत आहे. जुलै २०१७ व ऑक्टोंबर २०१७ या महिन्याचे बिले दरमहा १८४ युनिट प्रमाणे आकरण्यात यावीत. मात्र सप्टेंबर-ऑक्टोंबर २०१७ या कालावधीत मीटर बदलल्यामुळे, मीटर बदलल्याच्या तारखेपासून ती आकारणी मीटरप्रमाणे करण्यात यावी.

४) या बिलांवर दंड व व्याज आकरण्यात येऊ नये.

५) ग्राहक अर्जदारास मंचाचा निर्णय मान्य नसेल तर ग्राहक अर्जदार मंचाच्या निकालापासून ६० दिवसाच्या आत ब फॉर्म मध्ये आपले आवेदन खालील पत्त्यावर मा. विद्युत लोकपाल यांचे कडे सदर करू शकतात. फॉर्म ब या कार्यालयात कार्यालयीन कार्यालयीन वेळेत विनामूल्य मिळेल. मा. विद्युत लोकपाल यांचा पत्ता खालील प्रमाणे आहे.

मा.विद्युत लोकपाल
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,
प्लॉट नं.१२ श्रीकष्ण विजय नगर छावणी,
नागपूर-४४००१३.
दुरध्वनी क्र.०७१२-२०२२१९८
ठिकाण : - लातूर
दिांक :- ०२.०८.२०१८

अध्यक्ष
ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर

सदस्य
ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर

कार्यकारी अभियंता/सचिव
ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर



Scanned by CamScanner